# प्रेसनोट

## गुन्हे शाखेतील अधिकारी कर्मचारी यांची महत्तवाची बैठक

सन २०१७ मध्ये वार्षिक बदल्यामध्ये गुन्हे शाखेत नवीन अधिकारी कर्मचारी हजर झाल्याने प्रत्येकाचा परिचय व्हावा, येणा-या गणेश उत्सव विसर्जन मिरवणुकीचे संदर्भाने तसेच सराईत गुन्हेगाराविंरुध्द ठोस कारवाई करण्याचे संदर्भाने गुन्हे शाखेचे अप्पर पोलीस आयुक्त श्री. प्रदीप देशपांडे यांनी दि. ३०-०८-२०१७ रोजी मुख्यालय, शिवाजीनगर येथे गुन्हे शाखेतील सर्व अधिकारी व कर्मचारी यांची बैठक घेण्यात आली.

बैठकीमध्ये सुरवातीस सर्व अधिकारी व कर्मचारी यांचा श्री. प्रदीप देशपांडे यांनी स्वत परिचय करुन घेवून कनिष्ठ दर्जाचे अधिकारी व कर्मचारी यांचेमध्ये असणा-या विशेष कौशल्य, ज्ञान, शैक्षणिक पात्रता, गुन्हेगारांची माहिती याबद्दल प्रत्येक कर्मचा-यांकडे बारकाईने चौकशी केली. कर्मचा-यांमध्ये बॉम्बस्फोट, खुन, दरोडे यासारख्या महत्वाच्या गुन्हयांचे कागदपत्र तयार करण्यास मदत केलेले कर्मचारी, नयना पुजारी खुन खटल्यात कागदपत्र तयार करणारे कर्मचारी यांना खुले मनाने शाबासकी देवून कर्मचारी यांचा उत्साह वाढविण्याचा प्रयत्न केला. तसेच गुन्हे शाखेत असणा-या उच्च शिक्षित व तांत्रिक ज्ञान असणा-या, गुन्हेगारांचे ज्ञान असणा-या अधिकारी व कर्मचारी यांचा अधिक चांगल्या पध्दतीने उपयोग कसा करता येईल यावर चर्चा करण्यात आली.

शहरामधील सराईत गुन्हेगारांविरुध्द ठोस कारवाई करण्यासंदर्भात कोणकोणत्या पध्दतीने उपाययोजना करण्यात येतील याबाबत अधिकारी व कर्मचारी यांच्या सुचना ऐकण्यात आल्या.

तसेच आगामी गणेश उत्सव विसर्जन काळात बंदोबस्त करताना गुन्हे शाखेतील अधिकारी व कर्मचारी यांनी कोणत्या गोष्टींकडे लक्ष दिले पाहिजे याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले. अचानक उदभवलेल्या कायदा व सुव्यवस्था घटनांमध्ये पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी कोणत्या पध्दतीने काळजी घेतली पाहिजे याबद्दल वेगवेगळी उदाहरणे देवून चर्चा करण्यात आली.

बैठकीचे वैशिष्ठ म्हणजे ही बैठक एकतर्फी न होता कर्मचारी यांना सुचना मांडण्याचा, आपल्या अंगी असणारे कौशल्य, तांत्रिक ज्ञान, केलेली चांगली कामगिरी वरिष्ठांपुढे मांडण्याचे एक व्यासपीठ वजा सदरची बैठक होती. कर्मचारी यांनी सुध्दा अत्यंत चांगल्या सुचना मांडल्या त्यामुळे कर्मचा-यांमध्ये बैठकीनंतर समाधान दिसून आले. चांगले अधिकारी व कर्मचारी यांच्या पाठीशी मी नेहमी उभा राहीन त्याचप्रमाणे अवैध धंदेवाले, गुन्हेगार यांना सहानभुती दाखविणा-यांवर अधिकारी व कर्मचारी यांचेवर तेवढीच कडक कारवाई केली जाईल हे स्पष्ठ शब्दात सुनावले.

सदर बैठकीस पोलीस उपायुक्त, श्री. पंकज डहाणे, सहा. पोलीस आयुक्त श्री. सुरेश भोसले, श्री. संजय निकम व इतर सुमारे ७० अधिकारी व ३०० कर्मचारी हजर होते.